I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 155-159 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान

S. U. Ugemuge

Chintamani Mahavidyalaya, Pombhurna, Dist. Chandrapur.
*Corresponding Author: sanjayugemuge80@gmail.com

**सारांश :**

''जाळा ते अध्यात्म भाडवली ऐंका,
चुलीमध्ये फेका कर्मयोग''

अध्यात्म, कर्मकांड, यज्ञयाग हे ब्राम्हणानी पोटभरण्यासाठी निर्माण केलेले एक साधन आहे. आणि त्या साधनांची वारंवार भिंती दाखवून दिन दलितांना कितेक शतकापासून लूटत आहे. ही,शोषक निती थांबली पाहीजे. त्यासाठी दिनदलित वर्ग जागृत झाला पाहिजे ,आणि आपल्या न्याय हक्कासाठी लढले पाहीजे, असे जहाल विचार त्यानी आपल्या विचारातुन मांडले .या वर्गाना सुधारण्यासाठी एकच मार्ग सागितला, तो म्हणजे शिक्षण होय.शिक्षणनच मानवाचा संपूर्ण विकास घडवून आणू शकतो, असा आत्मविश्वास डॉ बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते.त्यासाठी त्यानीदु:खात पिचत पडलेल्या दिन दलित दुबळया समाजाच्या अंधकारमय जिवनात प्रकाशाची ज्योत पेटविण्याचे कार्य डॉ. बाबा साहेब आंबेडकरानी केले.'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र बहुजन वर्गाला दिला.तर विद्यार्थ्यांना 'वाचाल तर वाचाल' हा शिक्षणा विषयी मंत्र दिला.उच्चभ्रू वर्गाच्या बरोबरीने येण्यासाठी प्रत्येकांने शिक्षण घेतले पाहीजे आणि उच्चवर्गीयांची प्रशासनातील नोकरीतील असलेली मक्तेदारी मोडून टाकली पाहीजे.असा मोलाचा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आपल्या बहुजन वर्गाला दिला. त्यांनी संविधान निर्माण करतांना सर्व समाजातील घटकांचा विचार करून देशाची घटना निर्माण केली. ही घटना समतेवर आधारीत असल्याने सर्वाना समान अधिकार प्राप्त झाले. आजच्या बहुजन समाजाने आपले जुने खुळचट परंपरागत सामाजिक विचार बदलवून आधुनिक विचार पद्धतीच्या अवलंब केला पाहीजे.त्यांनी कर्मकांड सोडून त्यात वेळ न घालवता आपल्या समाजाचा व आपला विकास कसा होईल या गोष्टींकडे विचार करावा.उच्च वर्गियाच्या बरोबरीने आपण कसे येऊ याचा विचार करावा ,व त्या दृष्टिने प्रयत्न करावा असा मोलाचा उपदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी बहुजन वर्गाला दिला. प्रत्येकांनी विज्ञानवादी दुष्टीकोण ठेवायला पाहीजे. निसर्ग नियमांच्या विरूद्ध कोणतीच गोष्ट घडत नाही.हे सिद्ध केले.तसेच त्यांनी चमत्काराला विरोध केला.

**बिज सज्ञा :–** डॉ. बाबासाहेब आंबेडकराचेतत्वज्ञान स्पष्ट करणे

**प्रस्तावना :**

''शिक्षण म्हणजे वाघिनीचे दुध आहे, जो कोणी प्राशण करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही''. असा संदेश त्यांनी दिला. प्रत्येक विद्यार्थ्याने शिकून आपल्या अंगी असणाऱ्या गुणाचा विकास साधता आला पाहिजे. त्यासाठी ध्येय निश्चित असायला पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकरानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणतात तुम्ही शिकले पाहिजे आणि सरकारी नोकऱ्या मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. मला असा अनुभव आला आहे की सरकारी नोकरीत हल्ली एका जातीची मक्तेदारी होऊन बसली आहे. कलेक्टर ऑफिसात किंवा इतर प्रत्येक ऑफिसात एकाच जातीची माणसे आहेत. पुष्कळ लोक सांगतात की तुम्ही नोकरी साठी का भांडता ? लायकी असली की नोकरी मिळते. त्यात जातीचा कसला प्रश्न . परंतु आपल्या सामाजीक परिस्थितीचा विचार केल्यास नोकरी केल्यावर काय फायदा आहे, असे विचारने मुर्ख पणाचे आहे. कारण या देशात जातीभेदाचे फार मोठे जटिल

प्रस्थ आहे. आज ज्याच्याजवळ पैसा आहे . त्याच्याच हाती खरी सत्ता आहे. तो तिचा सदभावनेने उपयोग करून न घेता आपल्याच पोळीवर तूप ओढून घेतो. नोकरीमुळे पगार हातात येतो. ज्या समाजाला सरकारी नोकऱ्या नाहीत .तो समाज अधिकाऱ्यांच्या जागेवर जाणार नाही. तोपर्यत त्यांचा विकास होणार नाही. ब्राम्हण समाज सरकारी नोकरीत गुंतलेला आहे. त्यामुळे त्याचे सामर्थ्य वाढलेले आहे. व तो आपले वर्चस्व गाजवू शकतो. म्हणून तुम्ही सरकारी नोकऱ्या मिळविण्याचा पिच्छा पूरविल्यामूळे समाजाची उन्नती होईल. याचा तुम्ही कसोसीने प्रयत्न करा. तरच आपल्या समाजाच्या विकास होईल असा मोलाच सल्ला डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिला आहे.

पदवी प्राप्त केल्यानंतर नोकरी तर करा, त्याचबरोबर समाजाचीही उन्त्रती करा, असा सल्ला डॉ बाबासाहेबानी दिला. शिकलेल्या माणसात काही दोष असतात. शिकल्यावर नोकरीच्या मागे धावणे हा काही दोष नव्हे व ते अवगुण तूमच्या अंगात शिरणार नाही याची तुम्ही खबरदारी घ्या. पहिली गोष्ट शिक्षण पूर्णझाल्यावर माणूस स्वार्थी बनतो. मनूष्य स्वार्थी असणे हा स्वाभाविकच आहे. परंतू शिकलेला मनूष्य स्वतःचे हित पाहतो, समाजाचे पाहत नाही. तो आपल्या बायका पोरांचीच व स्वतःच्या हिताचीच काळजी घेतो. याविषयी मॅझिनी म्हणतो लोकात पारतंत्र पसरले, माणसे शिकली तरी त्याच्यात कर्तव्यापेक्षा हक्काची जाणिव होते. आपले कर्तव्य कोणते याची भावना जागृत होत नाही. हा एक शिकलेल्या माणसांचा दोष आहे. मला असे वाटते की शिकलेल्या मनुष्यास पदवी मिळाली आणि त्याला नोकरी मिळाली की त्यांचा विद्यार्जनाचा मार्ग सुटतो. विद्येचे महत्व खुंटले जाते. मी प्रवास करीत असतांना माझावळ चार पुस्तके व वर्तमान पत्रे असतात. परंतु प्रवासात जी शिकलेली माणसे दिसतात त्यांच्याजवळ पुस्तके वर्तमान पत्रां ऐवजी सीगारेडच्या पेटया मात्र दिसतात. मनुष्य बी.ए. झाला एम. ए. झाला म्हणजे त्याने सर्व ज्ञान संपादन केले, ही चुकीची भावना आहे. आपण विद्यासागराच्या गुडगा भर पाण्यात सुद्धा जावू शकत नाही. असा सल्ला डॉ बाबासाहेब आंबेडकर दिला.

विद्यार्थ्यानी अभ्यासात सतत सातत्य ठेवायला पाहीजे,विद्यासागराच्या ज्ञानसागरात प्रवेश करायला पाहीजे,ज्याप्रमाणे अगस्ती ऋशीने समुद्र प्राशन केला त्या प्रमाणे शिकून एखादी पदवी मिळाली म्हणजे आपण सर्व विद्या हस्तगत केली असे शिकलेल्या लोकांना वाटते. बडोदयाच्या संस्थानात एक गृहस्त होता. तो बी.ए.झाला होता. महाराजांनी त्याची नेमणूक एका खेडेगावात केली होती. त्यावेळी बडोदा संस्थानाचा कारभार गुजराती भाषेतून चालत होता. इंग्रजी मधून चालत नसे. तो मनूष्य फार आळसी होता. कधी चुकूनही टाईम्स पाहत नसे.याचा परिणाम असा झाला की त्याला काही वर्षानंतर बि.ए, बीए.सी. ची सुध्दा ओळख राहिली नाही. म्हणून विद्येचा व्यासंग नेहमी केला पाहिजे. ज्याप्रमाणे माणूस एकदा दारू प्यावयास लागल्यावर तो ती जन्मभर पीत राहतो. त्याच प्रमाणे विद्यार्जनाच्या बाबतीत झाले पाहिजे. विद्येची खरी गोडी कुणाला लागली. बायको पोरापेक्षा ज्याचे विद्येवर जास्त प्रेम आहे.

त्यालाच विद्येची गोडी लागली असे मी म्हणेल. माझ्या घरावर जरी सावकारीची जप्ती आली व माझ्या पुस्तकाला जर त्यांनी हात लावला तर त्यांना मी त्यांना जागच्या जागी गोळी घालून ठार करेल. मी पाहतो की आज शिकलेल्या मुलात सौदर्याची गोडी दिसते. लग्नात मुलगी सुदर आहे का? ती आपणास पसंत आहे काय ? वगैर गोष्टी पाहतो पण तोच हक्क मुलींना द्या. बऱ्याच सुदर स्त्रिया कुरूप माणसाच्या स्वाधिन झालेल्या आहेत. या देशाचा मला कंटाळा आलेला आहे परंतु मला माझ्या कर्तव्याची जाणीव आहे म्हणून मला इथे राहणे भाग पडले. या देशातील धर्म, सामाजिक रचना, सुधारणा व संस्कृतिचा याचा मला फार कंटाळा आलेला आहे.म्हणून नविन समाजरचना करायची आहे. जो समाज आधुनिक विचारसरणीचा असायला पाहीजे असे डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

सर्वसामान्य जनता पैसा हातात आल्यानंतर व्यसनामध्ये,खान्यापिन्यामध्ये उधळून लावतो. गाठीशी काहिही ठेवत नाही. तर दुसऱ्या जातीतील लोक पैसा कसा सांभाळून ठेवतो. याचे उदाहरण डॉ बाबासाहेब आंबेडकर देतात. येथील कोटयाधिश मारवाडयांच्या घरात काय दिसेल त्यांच्या घरात स्टॅच्यू ,फर्निचर, पेंटींग व पुस्तके यापैकी एकही वस्तू दिसनार नाही. हिच गोष्ट ब्राम्हणांची, एकाद्या ब्राम्हण कारकूनास पगार झाल्यावर तो आपल्या बायकोस एखादी सोन्याची पुतळी करण्याच्या गडबडीत असतो कारण सोने संकट समयी उपयोगी पडते. जगात फक्त जगने हेच ध्येय असेल तर पशू आणि माणूस यात फरक काय. मनूष्य संपत्तीची साठवण करू शकतो. पशूला ते करता येत नाही . नुसती कॉलर टाईट करून आणि टॉय बांधून सौदर्य वाढत नाही . आतापर्यंत दहा ,बारा वेळा विलायतेत गेलो. माझ्याबरोबर बरेच लोक विलायतेत आले होते. त्यांना आता मी पाहतो त्यांना वर्ण,धर्म ,जातपातच मान्य आहे. त्यांच्यावर काही एक परिणाम झालेला आढळत नाही. काय त्याचा हिंदू धर्मातील सर्व घाण त्यांना मान्य आहे . तुम्ही घाणित पडलेले रत्न आहात . अत्यंत घाणेरडया पाण्यात अत्तराचा थेंब पडावा त्याच प्रमाणे तुमची स्थिती झाली आहे. तुमच्या आईबापांना शिक्षण नाही अठराविश्वे दारिद्रये तेव्हा हा मैल साफ करणे हे तूमचे कर्तव्य आहे. बायबल मी वाचले आहे. मीठच जर अळणी झाले तर बाकी पदार्थास चव कशी येणार. कोणतेही कार्य करण्याकरीता आपल्या अंगचे गुण स्थिरावले पाहिजे. आणि ते स्थिरावण्याकरीता एक पिढीतरी लोटली पाहिजे. म्हणून स्वतः सुधारल्या शिवाय तुम्ही दूसऱ्यांना काय शिकवणार . सुधारणेचे मुळ वंशपरंपरगत रूजले गेले पाहिजे. या गुणांचा जर अभाव असेल तर आटोकाट प्रयत्नाने ते मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वरीष्ठ वर्गाशी सतत स्पर्धा केली पाहिजे ,तरच आपला कुठेतरी टिकाव लागणार आहे. यासाठी कठोर परीश्रम करणे आवश्यक आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय लोकसंख्येचा व त्याचा दुष्परीणामाचाही विचार केलेला दिसून येते.मुले कमी करा व त्यांना उच्चत्तम शिक्षण द्या,''छोटे कुंटूब सुखी कुंटूब'' असा मोलाचा सल्ला डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसामान्य जनतेला दिला.त्यासाठी त्याना आपले

स्वतःचे उदाहरण दिले .तुम्ही नोकरीवर जाल तुमच्यापैकी काही कारकून होतील आणि चवदा–चवदा पोरे झाली तर त्या चौदा पोरांचे काय होणार याची जबाबदारी समाजावर टाकणार याचा तुम्ही चांगला विचार करा. मला पाच मुले झाली त्यापैकी चार मेली त्याबद्दल मला आनंद वाटतो कारण ती मुले जगली असती तर त्याचे शिक्षण खानेपिने याचा बोजा माझ्यावर पडला असता. व ते मला फार त्रासाचे झाले असते. मला एकच मुलगा आहे. माझ्यावर त्याची फार जबाबदारी आहे. त्याच्या एक शतांश जबाबदारी आपल्या मुलाबद्दल दाखविली तर फारच उत्तम. ही समाजाच्या कल्याणाची गोष्ट आहे. तुम्हाला पाच सहा मुले झाली तर त्यांना शिक्षण कसे देणार त्याची काळजी कशी घेणार मला वाटते ही चढती भाजणीच्या ऐवजी उतरती भाजणी आहे तेव्हा स्त्री पुरूषाचे पुशू प्रमाणे जीवन घालविणे माणूसकीला सोडून आहे .याही गोष्टीचा आपण अवश्य विचार करावा. ही व्यवस्था मोडकळीस येऊन परीवर्तन यायला पाहीजे. तसेच स्त्री पुरूषांना समान अधिकार मिळाले पाहीजे व समानतेवर आधारीत समाजरचना निर्माण व्हायला पाहीजे असा मोलाचा सल्ला डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिला.

**निष्कर्श :**

डॉ. बाबा साहेब आंबेडकरानी जे तत्वज्ञान सांगितले आहे. त्यामुळे ब्राम्हण वर्गाची दुकाने बंद झाली आहे सर्वसामान्यांना कळून चुकले की, हे पोटभरण्याची साधणे आहे. त्यामुळे सर्वसामान्यांनी पुजापाठ, कर्मकांड, यज्ञयागविधी, करणे सोडून दिला आहे. व सर्वसामान्य जनता विज्ञानवादी बनू लागली आहे,विचार करू लागली.हा आंबेडकरी तत्वज्ञानाचा परीणाम म्हणावा लागेल. त्यांनी शिक्षण घेऊन हा वर्ग सुसिक्षित झालेल्या दिसून येतो त्या आधारावर बहुजन समाज नोकरीच्या स्पर्धेमध्ये उतरलेला दिसून येतो. आज प्रत्येक प्रशासकीय भवनात ,शाळा, महाविद्यालयात बहुजन वर्गानी नोकऱ्या प्राप्त केल्या आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरानी जर आपल्याला समानतेचे अधिकार प्रधान केले नसते तर उच्चभ्रू वर्गाने बहुजनाना प्रशासनात समाविष्ट होऊ दिले नसते . पण आज संविधानामुळे प्रत्येकाला कोणतीही नोकरी,कोणताही व्यवसाय करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.जर आपल्या अधिकारांचे हनन होत असेल तर प्रत्येक समाज आवाज उठवून सरकार पर्यत पोहचत आहे आणि आपल्या अधिकाराचे जतन करीत आहे. आज भारतातील बहुजन समाज जागृत झाला आहे. तो शिकायला लागला असून, प्रशासकिय नोकरीमध्ये दाखल झाला आहे. त्यांचा विचारामध्ये बदल होऊन आधुनिक विचारसरणी स्विकारली आहे. सनातनी विचाराला आता मुठमाती दिली जात आहे. मंत्रतंत्र ,कर्मकांड, सोवळे ओवळे यांच्या जंजाळयात न पडता आपला विकास कसा होईल याकडे त्यांनी लक्ष द्यायला सुरवात केली आहे.आज उच्च वर्गीयांना नोकऱ्यामध्ये स्पर्धा करणारे बहुजन वर्ग आहे.आज सर्वच खात्यामध्ये बहुजन वर्ग नोकरी करीत असल्याचे आपल्याला दिसत असते. हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचे, प्रयत्नाचे यशच म्हाणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ :**


दलितांचे शिक्षण –अनुवाद–देवीदास घोडेस्वार, संपादकः प्रदीप गायकवाड, क्षितीज पब्लिकेशन,नागपूर ,2004.

14 ऑक्टोबर 1956 रोजी बाबासाहेबांनी दिलेले भाषण

उघडया डोळयांच्या बुद्ध आणि डॉ. आंबेडकर –यशवंत मनोहर

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची– गाजलेली भाषणे

डॉ. आंबेडकराचा हिंदूधर्मावर – घनाघाती हल्ला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा –जनतेला उपदेश

डॉ. आंबेडकर बाबासाहेब – बुध्द आणि त्यांचा धर्म

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे – रमेश रघूवंशी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर – शंकरराव खरात

फुले शाहू आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार – धनराज डहा

माझी आत्मकथा –अनुवादः–राजेंद्र विठ्ठल रघुवंशी, रघुवंशी प्रकाशन ,पुणे, 1993

हिंदू धर्माचे तत्वज्ञान – अनुवाद–गौतम शिंदे, मनोविकास प्रकाशन,मुंबई 1998

Dhananjay Keer (1971) “Dr. Ambedkar’s Life and Mission” “Revival of Buddhism” Papular Prakashan, Mumbai

Dr. Ambedkar,B. R -“Annihilation of caste” Ambedkar B.R.(1987)“Writing and Speeches”The education Department,Government of Maharashtra, Mumbai

Dr.Ambedkar,B. R . (1957) “Lord Buddha and his Dhamma” Siddhartha Publication Mumbai